जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२८/०१/२०२५
## दि.२७/०१/२०२५ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे ५७/२०२५,भा.न्या.सं.कलम २८१,१०६(१)मो.वा.का.क.४/१२२,११९/१७७ |
| **फिर्यादी** | प्रणित गोंडेकर,वय २४ वर्षे रा.हिंजवडी,पुणे |
| **आरोपीत** | सुरज देवेद्रपंत लांडे,वय २७ वर्षे,रा.शिरजगाव कसबा ता.चांदुर बाझार जि.अमरावती सध्या रा. बावधन पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०१/२०२५ रोजी रात्रौ ०२/०० वा. सुमा.मुंबई-बेंगलोर हायवे रोडवर,चांदणी चौकाच्या दिशेने जिजाई टेकडीचे पुढे वारजे,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्याचा मित्र सुरज देवेद्रपंत लांडे,वय २७ वर्षे,रा.शिरजगाव कसबा ता.चांदुर बाझार जि.अमरावती सध्या रा.बावधन पुणे असे मोटार सायकलवरून चांदणी चौकाच्या दिशेने जात असताना नमुद ठिकाणी आले असता चांदणी चौकाकडे जाणारा सर्विस रोडपासुन चुकुन पुढे आले असता फिर्यादी हे गाडीवरुन खाली उतरुन थांबले असताना नमुद इसम याने फिर्यादीची मोटार सायकल वळवुन रहादारीच्या विरुध्द दिशेने चालवुन वारजेच्या दिशेने येणा-या एका गाडीला समोरुन घडक देऊन जखमी होऊन स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार शेलार ०२०/२५२३७७७७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाघोली पो स्टे ८५/२०२५,भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४) सह आयटी ॲक्ट ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४२ वर्षे रा.वाघोली,पुणे. |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/१२/२०२४ ते दि.०२/०१/२०२५ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यांनी शेअर ट्रेडिंग मार्फत नफा मिळवून देतो असे म्हणून पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडून फिर्यादीचा विश्वास संपादन करून जास्तीचा नफा मिळवून देण्याचे बहाण्याने फिर्यादीची १३,१५,००२/- रू ची आर्थिक फसवणूक केली. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.पंडीत रेजितवाड मो.नं. ९९२३८१९५३५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ६९/२०२५, भा.न्या.सं.कलम २९०,१०६,३(५) |
| **फिर्यादी** | पोलीस अंमलदार प्रविण गावित,खडक पो.स्टे.पुणे शहर. |
| **आरोपीत** | दोन इसम (कंत्राटदार व बिल्डर) (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/१२/२०२४ रोजी १६/३० वा.४१६,गुरुवार पेठ, गवरी आळी, पुणे येथील बांधकाम चालु असलेली इमारत ठिकाणी |
| **तपशिल** | खडक पो स्टे अ.मयत रजि.नं.१९१/२०२४, भा.ना.सु.सं कलम १९४ अन्वये झाले मयताचे तपासाचे चौकशी अंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद इसम ठेकेदार व बिल्डर यांनी त्याचे नमुद ठिकाणी चालु असलेल्या बांधकाम साईटवरील,मजुरांना सुरक्षिततेची कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील कामगार मोहन तुळया सलावत, वय ४१ वर्षे, रा. ७८०,रविवार पेठ,पुणे. हा इमारतीच्या |

लस्टरचे काम करत असतानाच,त्याचा तोल जावुन,वरून खाली पडुन, मार लागुन गंभीर दुखापत झाल्याने त्यांचे मृत्युस कारणीभुत झाले.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. अनिता तोंडे,मो.नं. ८३०८५६६७३७

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ७१/२०२५,भा,न्या.सं.कलम १०३(१),३(५)

**फिर्यादी** रणजित शिंदे पोलीस अंमलदार कोंढवा पोलीस स्टेशन पुणे.

**आरोपीत** १)बारीश उर्फ बार्या संजय खुडे वय २१ वर्षे,रा.कोंढवा खुर्द पुणे २)आकाश सुभाष माणकर वय २३ वर्षे,रा.गोकुळनगर पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२७/०१/२०२५ रोजी १५/३० वा.च्या सुमा.भैरवनाथ मंदीर समोरील,देवीदास काटे दशक्रिया विधी धाम,कोंढवा खुर्द,पुणे

**तपशिल** यातील नमुद इसम व मयत इसम हे नमुद ठिकाणी दारू पित बसले असताना अचानक उदभवलेल्या भांडणावरून त्यांनी यातील मयत इसम मल्लेश कुपेंद्र कोळी वय २२ वर्षे रा आबेंडकर वसाहत कात्रज कोंढवा रोड कात्रज पुणे याला मारहाण करून गंभीर जखमी करून जीवे ठार मारले.

**त.अंमलदार** पो.उप.निरी.रविंद्र गावडे मो.नं.९५९४९९३१९९

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** फरासखाना पो स्टे १८/२०२५,भादविक ४१९,४२०,४६८,४७१

**फिर्यादी** सचिन कामठे, वय ३८ वर्षे, रा.वडगाव शेरी,पुणे

**आरोपीत** एक इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१६/०२/२०२३ रोजी ते दि.१०/०४/२०२३ रोजी पर्यंत पुणे सिटी पोस्ट ऑफिस, बुधवार पेठ, पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी सहाय्यक अधिक्षक डाकघर,म्हणुन काम पाहत असुन नमुद इसम याने भारतीय डाक विभागाची ग्रामीण डाक सेवक ऑनलाईन भरती महाराष्ट्र सर्कल २०२३ डाक सेवक ऑनलाईन भरती प्रक्रियेद्वारे धनकवडी पोस्ट ऑफिस येथील डाक सेवक या पदाकरिता सादर केलेले त्याचे इयत्ता १० वी चे बनावट बोर्ड प्रमाणपत्र सादर करुन भारतीय टपाल खात्याची फसवणूक करुन डाक सेवक धनकवडी पोस्ट ऑफिस येथे नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला.

**त.अंमलदार** पो.उप.निरी.संतोष गोरे मो.नं.८९७५२४५१००

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** विश्रामबाग पो स्टे २६/२०२५,भा.न्या.लं.कलम,१३२,३२४(४)३५२,३५१(२)मो.वा.का.क.१९९अ,३,५

**फिर्यादी** उमेश नरुटे पोलीस अंमलदार विश्रामबाग वाहतुक विभाग, पुणे शहर.

**आरोपीत** एक इसम(अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२७/०१/२०२५ रोजी स.११/०० वा.च्या सुमा.नागनाथ पार चौक,पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी वाहतुक नियमन कर्तव्य करीत असताना एक मोपेड चालक हा अल्पवयीन असल्याचा संशय आल्याने त्याची गाडी थांबवली असताना त्याचेकडे वाहन चालविण्याचा परवाना नसल्याने त्यावर कारवाई करीत असतांना अल्पवयीन चालकाचा भाऊ नमुद इसम हा त्या ठिकाणी येऊन फिर्यादी करीत असलेल्या कायदेशिर कर्तव्येस प्रतिबंध करून फिर्यादीचा मोबाईल खाली पाडून नुकसान केले.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. गणेश फरतडे मो.नं.९८९२८४९२६२

**७**

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ६७/२०२५,भा.न्या.सं.कलम ३०४(२),३(५)

**फिर्यादी** एक इसम वय ३५ वर्षे रा.मंगळवार पेठ,पुणे.

**आरोपीत** तीन अज्ञात इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२७/०१/२०२५ रोजी रात्री ००/३० वा.चे सुमा.बंडगार्डन ब्रिजवर येरवडा,पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणावरून चालले असताना त्यांचे पाठीमागून आलेली मोटर सायकल वरील तीन अनोळखी इसमांनी फिर्यादीच्या गळयातील २,५०,०००/- रू.कि.ची सोन्याची चैन हिसकुन नेली.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. सोळुंके मो.नं.८९७५०२६५९९

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**